MHAU120006272020

**नि.दि.दावा क्र. – ५४/२०२०**
**आशाबाई वि. केशव**

## निशाणी ५ खाली आदेश

**०१.** प्रस्तुतचा अर्ज हा वादीने आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ नुसार दाखल केला आहे.

**०२.** वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ व ३ हे मौजे सावळदबारा, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद शिवेतील गट क्र.१९२ मधील ४ हेक्टर १६ आर चे बेकायदेशीर मालक व कब्जेदार असुन उपभोग घेत आहेत. प्रतिवादी क्र. ३ कडे मौजे देऊळगांव गुजरी, ता. जामनेर, जि. जळगांव शिवेतील गट क्र. २८६ एकुण क्षेत्र ६० आर चा बेकायदेशीर मालक व ताबेदार आहे. (सदर मालमत्तेस यापुढे 'वादमिळकत' असे संबोधण्यात येईल).

**०३.** वादीने पुढे असे कथन केले आहे की, वादी ही प्रतिवादी यांची बहिण आहे. वादीच्या लग्नाचा खर्च वरपक्षाने केला आहे. प्रतिवादी क्र. १ व ३ त्याचप्रमाणे त्यांचे आईवडिल यांनी वादीच्या लग्नाचा कोणताही खर्च केलेला नाही. प्रतिवादी क्र. १ व ३ हे विनाकारण वादमिळकतीमध्ये ७/१२ उता–यावरील बेकायदेशीर नोंदणीचा गैरफायदा घेवुन तिस–या व्यक्तीचा हक्क निर्माण करु शकतात. वादीने प्रतिवादी क्र. १ व ३ यांना १/४ हिस्सा दया म्हणुन विनंती केली, परंतु प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी वादीस स्पष्टपणे नकार दिला व म्हटले की, आम्ही तुला हिस्सा देत नाही, तुला जे करायचे ते करुन घे.

**०४.** प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रकरणात जबाब दाखल न केल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रकरण एकतर्फा चालविण्यात आले. प्रतिवादी क्र. ३ यांनी त्यांचा लेखी जबाब नि.क्र.१८ वर दाखल केला आहे. त्यामध्ये त्यांनी वादीने केलेली सर्व कथने नाकारली आहेत व त्यांनी असे कथन केले आहे की, वादीनेही सदरचा खोटा व बोगस दावा दाखल केला

आहे. त्याचप्रमाणे वादी ही न्यायालयासमोर स्वच्छ हाताने आलेली नाही व तिने आवश्यक त्या बाबी न्यायालयापासुन लपविल्या आहेत. तिने प्रतिवादी क्र. १ याने सन २०१९ मध्ये गट क्र. १९२ मधील ८२ आर शेतजमीन रविंद्र गायकवाड यांना विकल्याबाबतचा मजकुर न्यायालयापासुन लपवुन ठेवला आहे.

**०५.** प्रतिवादी क्र. ३ यांनी असे कथन केले आहे की, वडिलांच्या मृत्युनंतर गट क्र. १९२ मधील २ हेक्टर ४९ आर शेतजमीन ही प्रतिवादी क्र. १ व ३ यांच्याकडे आली. तेव्हापासुन प्रतिवादी क्र. १ व ३ हे सदर जमीनीचा उपभोग घेत आहेत. वाटणीच्या वेळेस वादी व प्रतिवादी क्र. २ यांनी त्यांचा हिस्सा घेण्यास नकार दिला होता, कारण ते त्यांच्या सासरी आहेत. त्याचप्रमाणे वादीचा दावा हा मुदतीमध्ये नाही. वादी हिने रविंद्र गायकवाड यांना सदर प्रकरणात पक्ष म्हणुन समाविष्ट केलेले नाही, त्यामुळे तिला तात्पुरता मनाई हुकुम मागण्याचा अधिकार नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादी क्र. ३ यांनी केली आहे.

**०६.** सदर अर्ज निकाली काढण्याकरीता खालील मुद्दे निघतात. त्याचे निष्कर्ष व कारणेमिमांसा खालील प्रमाणेः–

| अ.क्र. | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| ०१. | वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस आहे असे वादीने दाखविले आहे का? | **होय.** |
| ०२. | वादीच्या बाजुने सोयीचा तोल आहे असे वादीने दाखविले आहे का? | **..होय.** |
| ०३. | वादीच्या बाजुने मनाई हुकुम न दिल्यास त्यांचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल असे वादीने दाखविले आहे का? | **...<u>नाही</u>.** |
| ०४. | काय आदेश? | **...<u>अंतिम आदेश प्रमाणे</u>.** |

## कारणेमिमांसा

**मुद्दे क्र.– १ ते ३ करीताः–**

**०७.** सदरच्या प्रकरणामध्ये वादीने असे कथन केले आहे की, वादमिळकत ही वडिलोपार्जित आहे. त्यामुळे तिचा वादमिळकतीमध्ये हिस्सा आहे. प्रतिवादी क्र. ३ यांनी असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी क्र. २ यांनी वादमिळकतीमध्ये त्यांच्या हिस्सा वाटणीच्या वेळेस घेण्यास नकार दिला आहे. परंतु त्यांनी वादमिळकत ही वडिलोपार्जित असल्याबाबत काहीही कथन केलेले नाही. वादीने सुध्दा वादमिळकत ही वडिलोपार्जित असल्याबाबतचा कोणताही दस्त अभिलेखावर दाखल केला नाही. वादी हिने वादमिळकतीमधील तिचा हक्क घेण्यास नकार दिला की नाही ही बाब पुरावा झाल्यानंतरच सिध्द होईल.

**०८.** वादमिळकतीवर प्रतिवादी क्र. १ व २ यांचा ताबा असल्याची बाब वादी हिने मान्य केलेली आहे. तिने मुख्यत्वे तिस–या व्यक्तीचा हक्क वादमिळकतीमध्ये निर्माण होवु नये याकरीता मनाई हुकुम मागितलेला आहे. परंतु प्रतिवादी क्र. १ व ३ हे वादमिळकत विकण्याच्या तयारीत आहेत अशी कोणतीही बाब अभिलेखावर आलेली नाही. त्याचप्रमाणे वादी हिचे नांव वादमिळकत गट क्र. १९२ च्या ७/१२ उता–याला का लागले नाही याबाबतचा कुठलाही खुलासा वादीने वादपत्रामध्ये केलेला नाही. त्याचप्रमाणे वादीने सदर ७/१२ उता–याला आव्हान दिल्याचे सुध्दा दिसत नाही. त्यामुळे वादमिळकत गट क्र. १९२ मध्ये वादीचा हिस्सा काय ही बाब पुराव्यानंतरच सिध्द होईल. गट क्र. २८६ मधील ७/१२ उता–यामध्ये वादी हिचे नांव असल्याचे दिसते. त्यामुळे त्यामध्ये तिचा हिस्सा आहे असे प्रथमदर्शनी म्हणता येईल. वादमिळकत गट क्र. १९२ मधील शेतजमीन ही वादी व प्रतिवादी यांच्या वडिलांची होती असे दिसते. त्यामुळे वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस आहे असे म्हणता येईल. त्याचप्रमाणे सोयीचा तोल सुध्दा वादीच्या बाजुने असल्याचे दिसते.

**०९.** वादमिळकत गट क्र. १९२ मधील ८२ आर शेतजमीन प्रतिवादी क्र. १ यांनी रविंद्र गायकवाड यांना विकल्याचे फेरफार क्र. १३९७ वरुन दिसते. परंतु सदर बाब वादी हिने न्यायालयापासुन लपवुन ठेवली आहे असे दिसते.

**१०.** प्रतिवादी यांच्या विधीज्ञांनी त्यांची भिस्त **मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या लक्ष्मीबाई रामकृष्ण पाते व इतर वि. श्रीमती कोंडाबाई दत्तात्रय डुंबरे व इतर २०१० (३), बीसीजे ३२३** या न्यायनिवाडयावर ठेवली. त्यामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने **परिच्छेद क्र.–१६** मध्ये असे मत नोंदविले आहे की – *"As far as creating third party interest is concerned, provisions of Section 52 of the Transfer of Property Act are sufficient to take care of apprehension of the appellants. The appellants have not shown as to why, in addition to the statutory protection afforded by Section 52 of the Transfer of Property Act, the appellants need a further injunction from the Civil Court to restrain the respondents from creating any further interest in the property. Appellants could, if they so desire, register the* lis *so as to put third parties, to the notice that the property is the subject matter of a dispute before a Civil Court. It has to be noted that a Civil Court should ordinarily not put any restrictions on enjoyment of property by any one till the lis is finally decided or during the pendency of the* lis, *unless it is shown that the litigation could be rendered infructuous, if a preventive order is not passed."*

**११.** वरील न्यायनिवाडयावरुन असे दिसते की, वादी यांना कलम ५२ मालमत्ता हस्तांतरण कायदयाप्रमाणे योग्य ती कारवाई करता येते. त्याचप्रमाणे सदरचा दावा हा वाटणी संदर्भात असल्यामुळे वादी हिचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल असे दिसत नाही. त्याचप्रमाणे वादी हिने काही महत्वाच्या बाबी न्यायालयपासुन लपविल्या असल्यामुळे, त्यामुळे वादी ही स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेली नाही म्हणुन ती तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यास पात्र नाही. मी मुद्दे क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्र. ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.– ४ करीताः–**

**१२.** तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश होणकरीता तिन्हींही मुद्दयांचे उत्तर वादीच्या बाजुने असणे आवश्यक आहे. मुद्दे क्र.– १ ते ३ ला दिलेल्या कारणेमिमांसा वरुन असे दिसते की, वादी हे प्रतिवादी विरुध्द तात्पुरता मनाई हुकम मिळण्यास पात्र नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहेः–

# **<u>आदेश</u>**

**०१.** वादीचा अर्ज निशाणी क्र. ५ नामंजुर करण्यात येत आहे.

**०२.** खर्चाबाबत कुठलाही आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AMOL BHASKAR INGOLE
Date: 2022.09.14 10:23:08 +0530

**[अमोल भा. इंगोले]**

**<u>दिनांक</u> : १३.०९.२०२२.** दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
सोयगांव.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per original Order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | K. P. Dusane. |
| Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C., Soygaon. |
| Date | :- | 13.09.2022. |
| Order signed by presiding Officer on | :- | 13.09.2022. |
| Order uploaded on | :- | 14.09.2022. |